# प्रेसनोट

दि.०३/०१/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहिल्यानगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोपरगांव शहर पो.स्टे., जि.अहिल्यानगर गुरनं.०२/२०२५ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७(अ), १२ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)करण नारायण जगताप, वय–२८ वर्ष, खाजगी इसम, रा.यश बंगला, साई विश्व अपार्टमेंट जवळ, साईसिटी परिसर, कोपरगांव, जि.अहिल्यानगर<br>२)गणेश वैजीनाथ सोनवणे, वय–४० वर्ष, तलाठी सजा कोपरगांव, वर्ग–३, रा.रो हाऊस नं.४, साई हार्मोनी कॉलनी, साईसिटी परिसर, कोपरगांव, जि.अहिल्यानगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ६,५००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ६,५००/– रुपये |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांनी कोपरगांव येथील साई रेसिडेन्सी या इमारती मधील पहिल्या मजल्यावर सदनिका खरेदी केलेली आहे. सदर सदनिकेच्या खरेदी खताची नोंद सातबारा उता–यावर लावण्याकरीता तक्रारदार यांनी त्यांचा अर्ज व खरेदी खताची सूची क्र.२ ची छायांकीत प्रत तलाठी गणेश वैजीनाथ सोनवणे यांच्याकडे जमा केली होती. सदर सदनिकेच्या खरेदी खताची नोंद सातबारा उता–यावर लावण्याकरीता तलाठी गणेश सोनवणे व खाजगी इसम करण जगताप हे ६५००/– रुपये लाचेची मागणी करत असले बाबतची तक्रार दि.२/१/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे प्राप्त झाली होती.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि.२/१/२०२५ रोजी लाच मागणी पडताळणी केली. लाच मागणी पडताळणी दरम्यान तक्रारदार यांनी खरेदी केलेल्या सदनिकेच्या खरेदी खताची नोंद सात बारा उता–यावर लावण्यासाठी आरोपी करण नारायण जगताप यांनी स्वत: करीता व तलाठी सोनवणे यांचेकरीता पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे ६५००/– रुपये लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानंतर दि.२/१/२०२५ रोजी साई रेसिडेन्सी अपार्टमेंट, कोपरगांव येथे सापळा आयोजित केला असता तक्रारदार यांच्याकडुन खाजगी इसम करण नारायण जगताप यांनी पंचासमक्ष ६५००/– रुपये लाचेची रक्कम स्वीकारली असता त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. तसेच तलाठी सोनवणे यांनी करण जगताप यांनी स्विकारलेल्या लाचेच्या रकमेस प्रोत्साहन देवुन संमती दर्शविली असल्याचे निष्पन्न झाले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(अजित त्रिपुटे)
पोलीस उप अधीक्षक,
अँन्टी करप्शन ब्युरो, अहिल्यानगर